# बी. ए. भाग १ (संगीत, नृत्य, नाट्य)

## ह्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी

**महत्वाच्या सूचना**

(१) अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी **तीन शैक्षणिक वर्षे**. हा अभ्यासक्रम पूर्ण वेळाचा 'गुरुकुल' पद्धतीचा असून निवासी आहे. अभ्यासक्रमासाठी संपूर्ण दिवसभर विद्यापीठात उपस्थिती असणे आवश्यक आहे. प्रवेश चाचणी, तसेच प्रात्यक्षिक चाचणी घेऊनच विद्यार्थ्यास प्रवेश दिला जातो. त्यासाठी संगीत/नृत्य/नाट्य ह्या विषयात किमान गुणवत्ता असणे आवश्यक आहे.

(२) शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ ची प्रवेश चाचणी **सोमवार, दि.२९ जून २०१५** रोजी सकाळी ११ वा. ललित कला केंद्रात घेतली जाईल. प्रात्यक्षिक परीक्षेच्या पात्रतेसाठी लेखी चाचणी परीक्षेत किमान १६ गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेच्यावेळी कलाप्रात्यक्षिक व मुलाखतीची वेळ सांगितली जाईल. पुण्याबाहेरील विद्यार्थ्यांनी दि. २९ जूनपासून ४-५ दिवस राहण्याच्या तयारीने यावे. राहण्याची सोय स्वतः करावी लागेल.

(३) प्रवेश चाचणी तसेच प्रात्यक्षिक चाचणी यांसाठी तयारी कशी करावयाची याच्या मार्गदर्शनासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतः संपर्क साधावा. स्थळ : ललित कला केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७. वेळ : स. ११ ते १.३० व दु. २.३० ते ४. (फोन : २५६९२१८२, २५६०११६३)

(४) संगीत, नृत्य, नाट्य या प्रयोगजीवी कला असल्याने अभ्यासक्रमाची चौकट तुलनेत अत्यंत भिन्न व व्यक्तिप्रधान असते. त्यासाठी अध्यापकवर्गाशी तसेच अन्य गुरुंशी नियमित संपर्क ठेवावा लागतो हे लक्षात घ्यावे.

(५) बी.ए. (संगीत, नृत्य, नाट्य) या अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश अर्ज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुढील संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

संकेत स्थळ : http://www.unipune.ac.in/deptlalitkala

प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरून योग्य त्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रतींसह अंतिम तारखेच्या आत ललित कला केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७. येथे पाठवावा. प्रवेश अर्ज भरण्यासाठी काही शंका व अडचणी असल्यास ललित कला केंद्र येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधून विचाराव्यात.

प्रवेश अर्ज प्राप्त होण्याच्या **अंतिम तारखा** :

बी.ए. साठी : ऑनलाईन - बुधवार दि. २४ जून २०१५ व प्रत्यक्ष - शनिवार दि. २७ जून २०१५ सायं. ५ वाजेपर्यंत

(६) सरकारी नियमानुसार राखीव जागेचे ५०% हे प्रमाण प्रवेश देताना असेल. तसेच महिलांसाठी ३०% आरक्षण आहे.

(७) अंतिम निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना वार्षिक शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क त्वरीत भरणे आवश्यक आहे. **ही रक्कम रू. २६,०९०/- आहे.**

**: तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे स्वरूप :**

(श्र शैक्षणिक प्रवेश नियम मान्यता पत्र क्र. ६४७२, दि. २२/४/२००२ अन्वये)

**संगीत, नृत्य, नाट्य प्रवेश लेखी परीक्षा (अवधी १ तास) सोमवार दि. २९ जून, २०१५ रोजी स. १०.३० वा. ललित कला केंद्र येथे होईल. लेखी परीक्षेचे स्वरूप - संगीत, नृत्य, नाट्यविषयक सामान्य ज्ञानाचे प्रश्न विचारण्यात येतील. या परीक्षेत ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. म्हणजे ४० पैकी १६ गुण.**

## *संगीत*

१) **गायन :** एकूण ५ रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका रागातील तुम्हाला चांगला गाता येणारा बडा व छोटा ख्याल १५ ते २० मिनिटे सादर करण्याची क्षमता व आवडीचा कोणताही एक सुगम संगीतप्रकार गाता येणे अपेक्षित. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : एकूण **दोन** रागांची माहिती.)

२) **वादन (अवनद्ध वाद्य)** : एकूण ३ तालांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका तालामध्ये प्रत्येकी १५ ते २० मिनिटे सोलोवादन करण्याची क्षमता. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : एकूण **दोन** तालांची माहिती.)

३) **वादन (तंत व सुषिर वाद्य)** : किमान ५ रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी एका रागामध्ये मसीतखानी व रजाखानी गत वाजविण्याची क्षमता व सुगम संगीतप्रकार किंवा कोणत्याही रागातील धुन वाजविण्याची क्षमता. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : एकूण **तीन** रागांची माहिती.)

सूचना : **१)आपण कोणत्या स्वरात गाणार हे लेखीस्वरूपात द्यावे म्हणजे तानपुरे उपलब्ध केले जातील.**

**२) आपण निवडलेल्या राग व ताल यांची यादी केंद्रात आपल्या संपूर्ण नावासहित आधी सादर करावी. त्यावर आधारितच प्रश्न विचारले जातील.**

## *नृत्य*

१) **कथक :**

वंदना, गतभाव, साधी ठुमरी सादर करणे. ततकार आवश्यक, तीन ताल येणे आवश्यक, ताल ओळखणे, ताल देणे. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : किमान १० मिनिटे कथक नृत्य सादर करण्याची क्षमता.)

२) **भरतनाट्यम् :**

नृत्य आणि अभिनय यांवर आधारित पंधरा मिनिटांचे सादरीकरण करणे. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : मूलभूत अडवूंच्या साहाय्याने किमान १० मिनिटे भरतनाट्यम् सादर करण्याची क्षमता.)

## *नाट्य*

१) नाट्यक्षेत्रातील पूर्वानुभव आवश्यक.

२) तुमच्या कोणत्याही आवडत्या नाटकातील एक उतारा साभिनय वाचून दाखविणे. (ज्या नाटकात तुम्ही काम केलेले नाही असे नाटक निवडावे.)

३) ज्या नाटकात तुम्ही पूर्वी काम केलेले आहे त्या नाटकातील उतारा पाठ म्हणून दाखविणे.

४) आपल्या आवडीची कोणतीही मराठी कविता पाठ म्हणून दाखविणे.

५) आपल्या आवडीचे कोणतेही एक मराठी गाणे गुणगुणून दाखविणे.

६) कोणत्याही एका नाटकाच्या नेपथ्याचे रेखाचित्र काढून दाखविणे.

(* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : १, २, ३ अनिवार्य)

***टीप :*** संगीत, नृत्य, नाट्य विषयांच्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक सोमवार, दि. २९ जून २०१५ रोजी जाहीर करण्यात येईल.

**प्रात्यक्षिक परीक्षेस येताना विद्यार्थ्यांना सूचना :**

१) प्रात्यक्षिक परीक्षेस येताना सर्व विद्यार्थ्यांनी तानपुरे वगळता आपली वाद्ये घेऊन यावीत.

२) संगीत विषयासाठी वादक आपापले आणावेत. नसल्यास पूर्व कल्पनेनुसार ललित कला केंद्रातर्फे उपलब्ध केले जातील.

३) सर्वांनी स्वखर्चाने यावे. बाहेरगावच्या प्रवेशार्थ्यांनी ४-५ दिवसांच्या मुक्कामासाठी यावे.

४) वाद्ये प्रात्यक्षिक परीक्षेपूर्वी आपापल्या स्वरात लावून घ्यावीत.

५) **सर्व 'मूळ प्रमाणपत्रे' सोबत आणावीत.**

६) नृत्याच्या विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकासाठी येताना **साथीच्या संगीताची ध्वनिमुद्रित फीत** घेऊन यावी. नृत्याच्या विद्यार्थ्यांना जर संगीत साथीदार आवश्यक असल्यास त्यांची व्यवस्था त्यांनी स्वतः करावी.

## एम. ए. (संगीत, नृत्य, नाट्य)

## ह्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी

**महत्वाच्या सूचना**

(१) अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी **तीन शैक्षणिक वर्षे (पदव्युत्तरपूर्व वर्ष, एम.ए. भाग १, भाग २)**. हा अभ्यासक्रम पूर्णवेळाचा 'गुरुकुल' पद्धतीचा असून निवासी आहे. अभ्यासक्रमासाठी संपूर्ण दिवसभर विद्यापीठात उपस्थिती असणे आवश्यक आहे. प्रवेश चाचणी, तसेच प्रात्यक्षिक चाचणी घेऊनच विद्यार्थ्यास प्रवेश दिला जातो. त्यासाठी संगीत/नृत्य/नाट्य ह्या विषयात किमान गुणवत्ता असणे आवश्यक आहे. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा आहे.

(२) शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ ची प्रवेश लेखी चाचणी **सोमवार, दि. ६ जुलै २०१५** रोजी सकाळी १०.३० वा. ललित कला केंद्रात घेतली जाईल. प्रात्यक्षिक परीक्षेच्या पात्रतेसाठी लेखी चाचणी परीक्षेत किमान १६ गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेच्यावेळी कलाप्रात्यक्षिक व मुलाखतीची वेळ सांगितली जाईल. पुण्याबाहेरील विद्यार्थ्यांनी दि. ६ जुलैपासून ४-५ दिवस राहण्याच्या तयारीने यावे. राहण्याची सोय स्वतः करावी लागेल.

(३) प्रवेश चाचणी तसेच प्रात्यक्षिक चाचणी यांसाठी तयारी कशी करावयाची याच्या मार्गदर्शनासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतः संपर्क साधावा. स्थळ : ललित कला केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे - ७. वेळ : स. ११ ते १.३० व दु. २.३० ते ४.
(फोन : २५६९२१८२, २५६०११६३)

(४) संगीत, नृत्य, नाट्य या प्रयोगजीवी कला असल्याने अभ्यासक्रमाची चौकट तुलनेत अत्यंत भिन्न व व्यक्तिप्रधान असते. त्यासाठी अध्यापकवर्गाशी तसेच अन्य गुरुंशी नियमित संपर्क ठेवावा लागतो हे लक्षात घ्यावे.

(५) एम.ए. (संगीत, नृत्य, नाट्य) या अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश अर्ज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुढील संकेत स्थळावर उपलब्ध असतील.
संकेत स्थळ : http://www.unipune.ac.in/deptlalitkala
प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरून योग्य त्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रतींसह अंतिम तारखेच्या आत ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे - ७. येथे पाठवावा. प्रवेश अर्ज भरण्यासाठी काही शंका व अडचणी असल्यास ललित कला केंद्र येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधून विचाराव्यात.
प्रवेश अर्ज प्राप्त होण्याच्या **अंतिम तारखा** : एम.ए. साठी : ऑनलाईन - सोमवार दि. ६ जुलै २०१५

(६) सरकारी नियमानुसार राखीव जागेचे ५०% हे प्रमाण प्रवेश देताना असेल. तसेच महिलांसाठी ३०% आरक्षण आहे.

(७) अंतिम निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना वार्षिक शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क त्वरीत भरणे आवश्यक आहे. **ही रक्कम रू. ३६,९८०/- आहे.**

**: तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे स्वरूप :**

(* शैक्षणिक प्रवेश नियम मान्यता पत्र क्र. ६४७२, दि. २२/४/२००२ अन्वये)

**संगीत, नृत्य, नाट्य प्रवेश लेखी परीक्षा (अवधी १ तास) सोमवार दि. ६ जुलै, २०१५ रोजी स. १०.३० वा. ललित कला केंद्र येथे होईल. लेखी परीक्षेचे स्वरूप - संगीत, नृत्य, नाट्यविषयक**

**सामान्य ज्ञानाचे प्रश्न विचारण्यात येतील. या परीक्षेत ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. म्हणजे ४० पैकी १६ गुण.**

## *संगीत*

१) **गायन** : एकूण १० रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच तुम्हाला चांगले गाता येणाऱ्या तीन रागांतील बडा व छोटा ख्याल १५ ते २० मिनिटे सादर करण्याची क्षमता व आवडीचा कोणताही उपशास्त्रीय व सुगम संगीतप्रकार गाता येणे अपेक्षित. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : एकूण **पाच** रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच तुम्हाला चांगले गाता येणाऱ्या दोन रागांतील बडा व छोटा ख्याल १५ ते २० मिनिटे सादर करण्याची क्षमता व आवडीचा कोणताही उपशास्त्रीय व सुगम संगीतप्रकार गाता येणे अपेक्षित.)

२)**वादन (अवनद्ध वाद्य)** : एकूण ५ प्रचलित तालांची व २ अप्रचलित तालांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच तीन प्रचलित तालांमध्ये प्रत्येकी १५ ते २० मिनिटे सोलोवादन करण्याची क्षमता.

(* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : एकूण ५ प्रचलित तालांची व २ अप्रचलित तालांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच दोन प्रचलित तालांमध्ये प्रत्येकी १५ ते २० मिनिटे सोलोवादन करण्याची क्षमता.)

३) **वादन (तंत व सुषिर वाद्य)** : एकूण १० रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी तीन रागांमध्ये मसीतखानी व रजाखानी गत वाजविण्याची क्षमता व सुगम संगीतप्रकार किंवा कोणत्याही रागातील धुन वाजविण्याची क्षमता. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : एकूण ५ रागांची स्थूल माहिती असणे अनिवार्य तसेच त्यांपैकी तीन रागांमध्ये मसीतखानी व रझाखानी गत वाजविण्याची क्षमता व सुगम संगीतप्रकार किंवा कोणत्याही रागातील धुन वाजविण्याची क्षमता.)

**सूचना : १)आपण कोणत्या स्वरात गाणार हे लेखीस्वरूपात द्यावे म्हणजे तानपुरे उपलब्ध केले जातील.**
**२)आपण निवडलेल्या राग व ताल यांची यादी केंद्रात आपल्या संपूर्ण नावासहित आधी सादर करावी.त्यावरआधारितच प्रश्न विचारले जातील.**

## *नृत्य*

१) **कथक** :

श्लोक, भजन, गतनिकास, ततकार, गतभाव, परन, तुकडे, तिहाई करून दाखविणे. ताल देणे, ताल नाचणे, दोन ताल येणे आवश्यक. (* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : एका तालात किमान १० मिनिटे कथक नृत्य सादर करण्याची क्षमता.)

२) **भरतनाट्यम्** :

वर्णम् अत्यावश्यक आणि पदम्, जावळी, श्लोक यांपैकी एक रचना सादर करणे. (श्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : किमान १० मिनिटे भरतनाट्यम्मधील वर्णम् सादर करण्याची क्षमता.)

## *नाट्य*

१) नाट्यक्षेत्रातील पूर्वानुभव आवश्यक.
२) रंगभूमीच्या इतिहासाचे पदवी समकक्ष ज्ञान अनिवार्य.
३) तुम्हास दिलेल्या उताऱ्यांपैकी कोणत्याही एका उताऱ्याचे सादरीकरण.
४) तुम्हास दिलेल्या कोणत्याही एका कवितेचे पाठांतर म्हणून दाखविणे.
५) पूर्वी तुम्ही अभिनय केलेल्या कोणत्याही नाटकातील एखादा उतारा सादर करणे.
६) आपल्या आवडीचे एखादे मराठी गाणे गुणगुणून दाखविणे.

७) खालीलपैकी कोणत्याही एका नाटकाचा अभ्यास करून त्या नाटकाच्या नेपथ्याचे चित्रण काढून दाखविणे.

१) सखाराम बाईंडर – विजय तेंडुलकर २) महानिर्वाण – सतीश आळेकर ३) वाडा चिरेबंदी – महेश एलकुंचवार

(* मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी : १, २, ३, ४, ५ अनिवार्य)

**सूचना : ३ आणि ४ नाट्यमध्ये उल्लेख केलेल्या उताऱ्यांच्या प्रतींसाठी ललित कला केंद्र कार्यालयात संपर्क साधावा.**

***टीप :*** संगीत, नृत्य, नाट्य विषयांच्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक सोमवार, दि. ६ जुलै, २०१५ रोजी जाहीर करण्यात येईल.

**प्रात्यक्षिक परीक्षेस येताना विद्यार्थ्यांना सूचना :**

१) प्रात्यक्षिक परीक्षेस येताना सर्व विद्यार्थ्यांनी तानपुरे वगळता आपली वाद्ये घेऊन यावीत.

२) संगीत विषयासाठी वादक आपापले आणावेत. नसल्यास पूर्व कल्पनेनुसार ललित कला केंद्रातर्फे उपलब्ध केले जातील.

३) सर्वांनी स्वखर्चाने यावे. बाहेरगावच्या प्रवेशार्थ्यांनी ४–५ दिवसांच्या मुक्कामासाठी यावे.

४) वाद्ये प्रात्यक्षिक परीक्षेपूर्वी आपापल्या स्वरात लावून घ्यावीत.

५) **सर्व 'मूळ प्रमाणपत्रे' सोबत आणावीत.**

६) नृत्याच्या विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकासाठी येताना **साथीच्या संगीताची ध्वनिमुद्रित फीत** घेऊन यावी. नृत्याच्या विद्यार्थ्यांना जर संगीत साथीदार आवश्यक असल्यास त्यांची व्यवस्था त्यांनी स्वतः करावी.